माहि

GR-200407261328120001-0500

अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दूकानातून खरेदी करण्याची सक्ती न करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय, क्र. माशाव्य १२०४ (३३४ /०४)माशि-३.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक ११ जून २००४.

प्रस्तावना :-

राज्यातील अशासकीय मान्यताप्राप्त खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून अथवा शाळेने ठरवून दिलेल्या दूकानांतूनच खरेदी करण्याबाबत सक्ती केली जाते, अशाप्रकारच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. तसेच या संदर्भात काही पालकांनी काही शाळांच्याविरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका (क्र. २८४५/०२ व क्र.३३/२००३) दाखल केल्या होत्या. त्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालकांनी यासंबंधी सूचना शाळांना निर्गमित केल्या होत्या तथापि या सूचनांचे पालन काही शाळांकडून होत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत.

<u>शासन निर्णय :-</u>

शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश किंवा इतर शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून किंवा संस्था/शाळा सांगेल त्या विशिष्ट दूकानांतूनच खरेदी करण्याबाबत सक्ती शाळा/संस्था पालकांना करु शकत नाहीत. तथापि काही शाळांच्या व्यवस्थापनांकडून अशाप्रकारे पालकांवर सक्ती केली जाते. या बाबीचा विचार करुन अशाप्रकारची सक्ती पालकांवर /विद्यार्थ्यांवर करणा-या शाळांवर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शाळांनी खालील सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील :-

१) शाळांतील विद्यार्थ्यांना गणवेश अथवा अन्य शैक्षणिक साहित्य शाळेच्या भांडारातून किंवा शाळेने वा व्यवस्थापनाने ठरवून दिलेल्या विशिष्ठ दूकानातून खरेदी करण्याची सक्ती पालकांवर/विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या करता येणार नाही.

२) शाळेच्या दैनंदिन कामकाजात विद्यार्थी- व्यवस्थापन-शिक्षक-पालक यांच्यात समन्वय रहावा यासाठी शाळेचे कॅलेंडर, गणवेष किंवा अन्य अनुषंगिक साहित्यामध्ये बदल करावयाचा असल्यास व्यवस्थापनाने एक वर्ष अगोदर पालकांना तशा सूचना द्याव्यात.

उपरोक्त सूचनांचे पालन न करणा-या शाळा/व्यवस्थापनांविरुध्द विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल :-

१) अनुदानित शाळा असल्यास सदर शाळेच्या अनुदानात कपात करणे, अनुदान बंद करणे मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई तात्काळ करावी.

प्रकरणपरत्वे खालील २ प्रमाणेही कार्यवाही करता येईल.

२) विनाअनुदानित अथवा कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांना प्रथम लेखी ताकिद द्यावी अशाप्रकारे सक्त ताकिद देऊनही त्यांच्याकडून सूचनांचे पालन न झाल्यास सदर शाळांचे /संस्थांचे नाव "काळ्या यादीत" टाकावे. अशाप्रकारच्या शाळा/ संस्थांनी शासकीय जमीन, कर सवलती, तसेच इतर शासकीय सवलती मिळाल्या असतील तर त्या बंद करण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दाखल करावा. संबंधित व्यवस्थापन/संस्थेस नवीन शाळा, महाविद्यालये व इतर उपक्रम सुरु करण्यास शासन परवानगी देण्यात येऊ नये अशी विनंती संबंधित मंत्रालयीन विभागांना शालेय शिक्षण विभागामार्फत करावी. तसेच शाळेचीमान्यता रद्द करण्याची कार्यवाही सुरु करावी.

३) सीबीएसई व आयसीएसईशी संलग्न शाळांच्या संदर्भात संबंधित मंडळाना याबाबतची माहिती द्यावी व त्यांच्याकडून याबाबत पुढील कार्यवाही न झाल्यास संबंधित शाळांना देण्यात आलेले राज्य शासनाचे "ना हरकत प्रमाणपत्र" रद्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा. ना. मुसळे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व शिक्षण संचालक
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, माशि-३